Publication: Sakal
Date: 1/1/2020
Page: 3
Column: 5-8

सकाळ
मुंबई, बुधवार,
१ जानेवारी २०२०

# आदिवासींच्या दारी योजनांची माहिती

## अदाणी इलेक्ट्रिसिटीचा महिलांसाठी विशेष 'मेरी संगिनी' उपक्रम

मुंबई, ता. ३१ : आदिवासी पाड्यांवरील तसेच झोपडपट्ट्यांमधील गरीब महिलांना त्यांच्यासाठी असलेल्या सरकारी योजनांची माहिती देण्यासाठी मेरी संगिनी उपक्रम अदाणी इलेक्ट्रिसिटीने हाती घेतला आहे. महिला सक्षमीकरणाचा हेतू साधण्यासाठी या योजनेत महिलांनाच प्रशिक्षित केले जाणार आहे.

तळागाळातील विविध समाजघटकांसाठी केंद्र व राज्य सरकारच्या ४०० योजना आहेत; मात्र आदिवासी पाड्यांवरील तसेच झोपडपट्ट्यांमधील अशिक्षित नागरिकांना त्याची माहिती नसते. त्यामुळे या नागरिकांना अशी माहिती देण्यासाठी किमान चारशे ते पाचशे मेरी संगिनी स्वयंसेविका तयार करण्याचा हा उपक्रम आहे. त्यांच्या मदतीसाठी अदाणीच्या पुढाकाराने एक मोबाईल ॲपही तयार करण्यात आले असून त्याद्वारे गरजूंना सर्व माहिती मिळेल. त्यासाठी पथदर्शी प्रकल्प २७ आदिवासी पाडे असलेल्या आरे कॉलनीत हाती घेण्यात आला आहे. आरे कॉलनीतील बऱ्याच जणांकडे जात प्रमाणपत्र, आधार कार्ड, विवाह नोंदणी प्रमाणपत्र नसल्याचेही आढळून आल्याने आरेची निवड यासाठी करण्यात आली आहे. स्थानिक सुशिक्षित आदिवासी महिलांनाच मेरी संगिनी उपक्रमात सहभागी करण्यात आले आहे. गरजू नागरिकांसाठी असलेल्या सरकारी योजना, त्यासाठीची पात्रता, त्यासाठी लागणारी कागदपत्रे, ती कधी व कोठे द्यायची याची माहिती या संगिनी स्वयंसेविका सर्व नागरिकांना देतील.

> **कौटुंबिक हिंसाचारासारख्या समस्यांवर आदिवासी महिला संगिनी स्वयंसेविका म्हणून काम करतील. सरकारी योजनांचा लाभ गरिबांना मिळवून देण्यासाठी त्या दुव्याचे काम करतील.**
> – सुषमा ओझा, संचालिका, अदाणी फाऊंडेशन

संगिनी स्वयंसेविका तयार करण्यासाठीही त्या प्रशिक्षण देतील. त्यानंतर अदाणीतर्फे चेंबूर-टिळकनगरमध्ये व नंतर साऱ्या मुंबईत अशा चारशे ते पाचशे संगिनी स्वयंसेविका तयार केल्या जातील. त्याखेरीज अदाणीतर्फे अंधेरीत महिलांसाठी कौशल्य विकास केंद्राची उभारणी केली जाईल. तेथे दरवर्षी बाराशे महिलांना स्वयंरोजगाराचे विविध प्रकारचे प्रशिक्षण दिले जाईल. त्याचबरोबर शहरातील बावीसशेपेक्षा जास्त शाळांमध्ये स्वच्छतागृह आणि मुलांची सुरक्षितता हा प्रकल्पदेखील सुरू केला जाईल.

महापालिका, अनुदानित तसेच खासगी शाळांमध्ये हा प्रकल्प मुले राबवतील व शिक्षक त्यांचे मार्गदर्शक असतील.